रे. फौजदारी खटला क्र. **<u>१०५३/२०२३</u>**
सरकार विरूद्ध राजकुमार वामन
**निशाणी २५**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

| | |
|---|---|
| माझे नाव | : विपुल अनंतराव मोहोकार, |
| वय | : ३३ वर्षे, |
| धंदा | : शेती, |
| राहणार | : वणी वारूळा, ता. अकोट, जि. अकोला. |

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

मी फिर्यादी विनोद संपत वानखडे यांना ओळखतो. मी आरोपी राजकुमार वामन वानखडे याला देखील ओळखतो. अकोट ग्रामीण पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी बोलाविले किंवा कसे हे मला आता आठवत नाही. पोलीसांनी माझे समक्ष गावात येवुन लिखापढी केली नाही. मी पोलीसांना सही दिली किंवा कसे हे मला आता आठवत नाही.

(***साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली***.)

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०४/०८/२०२३ रोजी अकोट ग्रामीण पोलीसांनी मला आरोपी राजकुमार याचे घरासमोर मुंडगांव रस्त्यावर बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळावरून एक दगड जप्त केला व त्याबाबत पंचनामा माझे समक्ष तयार केला व तो वाचून मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर पंचनाम्यावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनाम्यातील मजुकर खरा वबरोबर आहे व तो माझे समक्ष तयार करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझेसोबत सदर पंचनाम्यावर निळकंठ पंजाबराव मोहोकार यांनी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळावरून एक दगड जप्त केला होता.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व मी एकाच गावातील रहिवासी आहोत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी** — आरोपीतर्फे ॲडव्होकेट श्री. एस. आर. खोखले यांचे मार्फत नाकरण्यात आली.

**फेरतपासणी** — काही नाही.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०७.०७.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

**RCC No. 1053/2023**
**Evidence/Exh. 25**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F file Evidence are same word to word as per the original evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. N. DURATKAR |
| Court Name | : | 2nd Joint Civil Judge (Jr.Dn.) & JMFC, Akot, Tq. Akot, Dist. Akola |
| Date of decision | : | 07/07/2025. |
| Evidence Signed by P.O on | : | 07/07/2025. |
| Evidence Uploaded on | : | 08/07/2025. |